कृषि विद्यापीठातील कृषि सहाय्यक संवर्गाच्या
पदोन्नतीचे प्रमाण वाढविण्याबाबत

# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

## विद्यापीठ परिपत्रक क्र. अेपीबी-२/२०२०

## दिनांक: ३१.३.२०२०

वाचा: १. कृषि विद्यापीठ परिनियम-१९९० मधील परिनियम क्र. ८८ (२ व ३)
२. कार्यकारी परिषद ठराव क्र. का-११ दिनांक १.६.२०१९
३. डॉ.बा.सा.को.कृ.वि. दापोली येथील कार्यकारी परिषद ठराव क्र. २३८/८ दिनांक १६.२.२०१६

### प्रस्तावना:

**वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी** येथील कृषि सहाय्यक संवर्गात पदोन्नतीसाठी १० टक्के प्रमाण ठरलेले आहे. सदर पदोन्नतीचे १० टक्के प्रमाण वाढवून १५ टक्के करण्याबाबत निवेदन प्राप्त झाली होती. संदर्भ क्र. ३ नुसार डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांनी संदर्भ क्र. १ वरील तरतुदीचा वापर करुन कृषि सहाय्यक संवर्गातील पदोन्नतीचे प्रमाणे १० वरुन २० टक्के केलेले आहे. विद्यापीठाने कृषि सहाय्यक संवर्गाच्या पदोन्नतीचे प्रमाण वाढविण्याकरीता कार्यकारी परिषदे मध्ये प्रस्ताव ठेवला होता. कार्यकारी परिषदेने राज्यातील इतर कृषि विद्यापीठामध्ये कृषि सहाय्यक संवर्गाच्या पदोन्नतीच्या प्रमाणाबाबत शहानिशा करुन पुढील कार्यवाही करण्याबाबत सूचित केले होते. तसेच कार्यकारी परिषदेने वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठातील कर्मचाऱ्यांची कुंठीतता दूर होण्याच्या दृष्टीकोनातून निम्न संवर्गातून कृषि सहाय्यक पदावर पदोन्नतीचे प्रमाण १० वरुन १५ टक्के करण्यास संदर्भ क्र. २ वरील ठरावानुसार मान्यता दिली आहे. सदर ठरावाच्या अनुषंगाने वसंतराव मराठवाडा कृषि विद्यापीठातील कृषि सहाय्यक संवर्गाचे पदोन्नतीचे प्रमाणे वाढविण्याची बाब विचाराधीन होती.

### विद्यापीठ परिपत्रक:

प्रस्तावनेत नमूद बाबी विचारात घेवून, वसंतराव मराठवाडा कृषि विद्यापीठातील कृषि सहाय्यक संवर्गाचे पदोन्नतीचे प्रमाण १० टक्के वरुन १५ टक्के करण्यास **सदर परिपत्रकाव्दारे खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

१. कृषि सहाय्यक संवर्गातील पदाच्या बिंदुनामावली मध्ये पदोन्नती व सरळसेवेच्या प्रमाणामध्ये बदल करुन सुधारीत बिंदुनामावलीस सहाय्यक आयुक्त (मावक), औरंगाबाद यांची मान्यता घेण्यात यावी.

२. पदोन्नतीच्या प्रमाणात बदल केल्यामुळे सरळसेवेतील कार्यरत कर्मचारी अतिरिक्त ठरत असल्यास त्यांचे प्रथम समायोजन करुन त्यानंतरच पदोन्नतीचे प्रमाण लागू करण्यात यावे.

३. सदर सरळसेवा/पदोन्नतीच्या प्रमाणानुसार अंपग प्रवर्गाकरीता प्रचलित नियमानुसार जागा सुनिश्चित करण्यात याव्यात.

४. शासनपत्र कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, क्रमांक संकीर्ण १५१७/ प्र.क्र.२४६/६-अे दिनांक ३०.५.२०१७ अन्वये सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २६.१०.२००४ च्या शासन निर्णयानुसार ज्यावेळी विहित टक्केवारीनुसार/बिंदुनामावलीनुसार आरक्षित पदे उपलब्ध नसतील व मागासवर्गीय कर्मचारी/अधिकारी त्यांच्या सेवाजेष्ठतेनुसार उपलब्ध असला तर त्यांना केवळ आरक्षित पद/बिंदु उपलब्ध नाही म्हणून पदोन्नती नाकारली न जाता, त्यांना अनारक्षित पदावर/बिंदूवर पदोन्नती दिली जाते. मात्र, ज्यावेळी अशा प्रकारे सेवाजेष्ठतेनुसार अनारक्षित पदावर बिंदूवर पदोन्नती देण्यात आलेल्या मागासवर्गीय कर्मचारी/अधिकाऱ्याच्या स्वतःच्या प्रवर्गात पद/बिंदू रिक्त होते, त्यावेळी अशा मागासवर्गीय कर्मचारी/अधिकाऱ्यास त्याच्या रिक्त झालेल्या बिंदूवर समायोजित केले जाते व आरक्षित व अनारक्षित पदांचे टक्केवारीनुसार योग्य प्रमाण राखले जाते. त्यामुळे, अशा प्रकारे समायोजनाची केलेली कार्यवाही योग्य असल्याचे सामान्य प्रशासन विभागाने स्पष्ट केले आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

५. शासनपत्र सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-२०१७/ प्र.क्र.३१२/अ/१६-ब, दिनांक २९.१२.२०१७ अन्वये पदोन्नतीचे आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा. उच्च न्यायालयाने याचिका क्र. २७९७/२०१५ वर दिनांक ४.८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने पदोन्नती देण्यासंदर्भात मार्गदर्शनपर सुचना दिल्यानुसार कार्यवाही करण्यात यावी. तसेच या संदर्भात वेळोवेळी निर्गमीत होणाऱ्या शासन निर्णयाच्या अधिन राहुन कार्यवाही करण्यात यावी.

६. कृषि सहाय्यक संवर्गाची सुधारित शैक्षणिक अर्हता बदलाबाबत कृषि परिषद, पुणे यांना पाठविण्यात आलेली आहे. सदरील कृषि परिषदेच्या निर्णयाच्या अधीनराहून पदोन्नतीबाबत कार्यवाही करण्यात यावी.

मा. कुलगुरु यांचे मान्यतेने....

(रणजीत आ. पाटील)
**कुलसचिव**

**प्रतिलिपी:**

१. संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि), वनामकृवि, परभणी.
२. संचालक संशोधन, वनामकृवि, परभणी.
३. संचालक विस्तार शिक्षण, वनामकृवि, परभणी.
४. सहयोगी अधिष्ठाता (शिक्षण), वनामकृवि, परभणी.

**प्रत:**

१. मा. कुलगुरु यांचे खाजगी सचिव, वनामकृवि, परभणी.
२. प्रभारी अधिकारी, मध्यवर्ती संगणक केंद्र, परभणी यांना देवून कळविण्यात येते की, सदरील परीपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.
३. अेपीसी-१/अेपीसी-२ कार्यासनास पुढील कार्यवाहीस्तव.